POMEGRANITE CONFERENCE 7th Feb 2021

॥ श्री चैतन्य स्वामी प्रसन्न ॥

# डाळींब पिक परिसंवाद

रविवार, दि.७ फेब्रुवारी २०२१
सकाळी १०.३० ते १.३० वाजता



प्रमुख मार्गदर्शक -

**मा.श्री बाबासाहेब गोरे** (डाळींब रत्न पुरस्कार प्राप्त)
**श्री राजेंद्र सुपेकर** (कृषि अधिकारी , आष्टी तालुका)

श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ संचालित , गांधी महाविद्यालय कडा व ग्रामपंचायत, देवळाली (पानाची) यांच्या संयुक्त विद्यमाने आधुनीक शेती तंत्रज्ञान अंतर्गत 'डाळींब पिक परिसंवाद ' या विषयावर तज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे.तरी गावातील व परिसरातील शेतकरयांनी उपस्थित राहुन या संधीचा लाभ घ्यावा .

## - आयोजक -

श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ संचालित, गांधी महाविद्यालय कडा,ता.आष्टी, जि.बीड व ग्रामपंचायत देवळाली (पानाची) ता.आष्टी, जि.बीड

## - कार्यक्रमाचे स्थळ -

चैतन्य स्वामी मंदिरा समोर , देवळाली (पानाची )

टिप - कार्यक्रम वेळेवर सुरु होईल , सदरील कार्यक्रमा मध्ये अन्य सत्कार व भाषणे होणार नाहीत. तसेच कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर सामाजीक अंतर ठेउन आपली उपस्थिती नोंदवावी. कार्यक्रमास मास्क घालणे अनिवार्य आहे .

लोकमत
शुक्रवार १२.२.२०२१
हॅलो बीड
epaper.lokmat.com

LIBRARY

# देवळालीत डाळिंब पिकाबाबत परिसंवादाद्वारे मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

कडा : आष्टी तालुक्यातील कडा येथील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालय व ग्रामपंचायत देवळाली (पानाची) यांच्या संयुक्त विद्यमाने डाळिंब पीक परिसंवादात, महाराष्ट्र शासनाचा 'डाळिंब रत्न' पुरस्कारप्राप्त बाबासाहेब गोरे व आष्टी तालुका कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

अध्यक्षस्थानी कांतीलाल चाणोदिया व विश्वस्त उपाध्यक्ष बाबूलाल भंडारी उपस्थित होते. प्राचार्य डॉ.एन.एस.राठी, उपप्राचार्य डॉ.जे. एम. भंडारी, पंचायत समिती सदस्य परमेश्वर शेळके, सरपंच बबनराव तळेकर उपस्थित होते. प्रास्ताविकात प्रा. डॉ. विशाल वैद्य यांनी सेंद्रिय शेती, गांडूळ खत प्रकल्प, सुधारित बियाणे तंत्रज्ञान, एकात्मिक कीड नियोजनाविषयी माहिती दिली. प्राचार्य डॉ.नंदकुमार राठी यांनी वसुंधरा संवर्धन काळाची गरज या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी मास्क व गुलाब पुष्प देऊन शेतकऱ्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रा. डॉ. चंद्रशेखर तळेकर, प्रा. डॉ. रमेश आबदार, अशोक खाडे, प्रा.गवळी एन.टी, प्रा.डॉ. जाधवर पी. बी., प्रा. हासे एस.आर व प्रा.डॉ. शिंदे एस.एम. यांनी परिश्रम घेतले.

सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुदाम जाधव यांनी केले. सुनील खाडे यांनी आभार मानले. यावेळी महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा पर्यावरणपूरक उपक्रम महाविद्यालयाने अंगीकृत करण्यासाठी श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष कांतीलाल चाणोदिया, विश्वस्त अध्यक्ष गोकुळदास मेहेर, कार्याध्यक्ष योगेशकुमार भंडारी, सचिव हेमंतकुमार पोखरणा, उपाध्यक्ष रमेशलाल गुगळे व अनिलकुमार झाडमुथ्था, मंत्री बिपीनकुमार भंडारी, विनोद बलदोटा, कोषाध्यक्ष डॉ.उमेश गांधी, तसेच सर्व पदाधिकारी, सदस्य, विश्वस्त व कार्यकारी मंडळांनी प्रोत्साहन दिले.



कडा येथील गांधी महाविद्यालयात बाबासाहेब गोरे यांनी मार्गदर्शन केले.

## मृदा, जल परीक्षण काळाची गरज

- यावेळी बाबासाहेब गोरे यांनी शास्त्रीय पद्धतीने डाळिंब पीक व्यवस्थापनावर मार्गदर्शन करून सेंद्रिय औषधांचे उपयोग सांगितले. तालुका कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर यांनी शासनाच्या विविध कृषी योजनांची माहिती दिली.
- मृदा व जल परीक्षण काळाची गरज असल्याचे ते म्हणाले. बाबूलाल भंडारी यांनी श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ येत्या तीन वर्षात शतक महोत्सवात पदार्पण करणारी जिल्ह्यातील एकमेव जैन अल्पसंख्यांक संस्था असल्याचे सांगितले.

Dalimb Peek Parisanvad for farmers at Deolali (P)

## Report of Dalimb Pik Parishad (Pomegranite conference) on 07/02/21








डाळींब पिक परिसंवाद


डाळींब पिक परिसंवाद
डाळींब पिक परिसंवाद











